ISSN 2231-1629
Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# भारतीय परराष्ट्र धोरणः सर्वसमावेषक सुरक्षा दृष्टीकोन

**डॉ. कविता डी. धर्माधिकारी**
*संरक्षण व सामरिकशास्त्र विभागप्रमुख*
*एस. पी. डी. एम. महाविद्यालय, शिरपुर जि. धुळे*

प्रास्ताविक :

प्रत्येक राष्ट्र आपणांस योग्य असलेले वर्तन इतर राष्ट्रांनी करावे, यासाठी आपल्या प्रभावाचा विविध स्वरुपात वापर करुन त्या–त्या राष्ट्रातील राज्यकर्त्यांचे मन वळविते. यालाच स्थुलमानाने परराष्ट्र धोरण म्हणता येते. एकोणीसाव्या शतकांत राष्ट्रवादाच्या उदयानंतर प्रत्येक राष्ट्र स्वतंत्र असावे हे तत्व सर्वमान्य झाले जगातील अशा स्वतंत्र राष्ट्रांच्या परस्पर संबंधास आकार लाभून त्यातुन एका आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचे रुप निर्माण झाले. आधुनिक काळात प्रत्येक राष्ट्र आंतरराष्ट्रीय समुदायाचा एक भाग असल्यामुळे इतर राष्ट्रांशी आपले संबंध निश्चित करण्याच्या योजनेतुन त्यांस आपले परराष्ट्र धोरण ठरवावे लागते. 'धोरण' या शब्दातुन पूर्वनियोजनाचा अर्थ ध्वनित होतो. अंतर्गत क्षेत्रातील आर्थिक किंवा सामाजिक धोरणापेक्षा परराष्ट्र धोरणाचे स्वरुप वेगळे असते. राष्ट्रांतर्गत घटकांवर ज्याप्रमाणात राज्यकर्त्यांचे नियंत्रण असते, त्यामानाने आंतरराष्ट्रीय समुदायाच्या घटकांवर त्यांचे नियंत्रण अत्यल्प असते म्हणुनच परराष्ट्र धोरण हे अनेक अनियंत्रीत घटकांवर अवलंबून असते आणि म्हणुनच आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील आपली उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी कोणत्याही राष्ट्रास कालबध्द, योजनाबध्द असे आखीव धोरण ठरविणे भाक्य नसते, तर आपले ईप्सित साध्य करण्यासाठी स्वतःच्या नियंत्रणाबाहेर असलेले अनेक घटक आणि अकल्पित घडणा–या घटना लक्षात घेऊन आपल्या धोरणाची दिशा व डावपेच ठरवावे लागतात. परराष्ट्र धोरण परिणामकारक होण्यासाठी त्यांत एकसुत्रता आणि लवचिकपणा हे दोन्ही गुण आवश्यक आहेत.[1] प्रत्येक देशाची भौगोलिक स्थिती, अर्थव्यवस्था, राजकिय व ऐतिहासिक परंपरा, सांस्कृतिक वातावरण या सर्वांच्या प्रभावातून देशाच्या परराष्ट्र धोरणाचे लक्ष्य ठरते हे लक्ष्य वस्तुनिष्ठ परिस्थितीतून ठरले असल्यामुळे ते कायम असते याचाच निर्देश 'राष्ट्रहित' या संज्ञेत केला जातो. ''परराश्ट्र धोरणाने राष्ट्र हिताचे संवर्धन केले पाहिजे'' असे हेन्रि मॉर्गेन्थॉ यांनी प्रतिपादन केल आहे.[2] असे असले तरी एखाद्या देशाचे सर्व प्रकारचे हित परस्परपुरक, सुसंगत, सारखेच महत्वाचे असेल असे नाही. आजुबाजुच्या राष्ट्रात व जगात जे तांत्रीक, लश्करी, आर्थिक, सुरक्षात्मक, राजकिय, सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणात्मक बदल होतात त्यानुसार त्यांतही बदल होणे स्वाभाविक आहे. प्रस्तुत संशोधनात परराष्ट्र धोरण : सर्वसमावेशक सुरक्षा दृष्टिकोन, या विषयांवर विचार मांडले आहेत.

**उद्देश :**

1. परराष्ट्र धोरणाची संकल्पना समजुन घेणे.
2. परराष्ट्र धोरणाचे घटक अभ्यासणे.
3. परराष्ट्र धोरणाच्या समग्र दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.
4. भारताच्या परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे समजुन घेणे.
5. भारताच्या परराष्ट्र धोरणाची आधारभूत तत्वे अभ्यासणे.

**गृहितके :**

संशोधन पत्रिका लेखन करतांना काही परिकल्पना निश्चित आहेत.

1. परराष्ट्र धोरण परिस्थिती सापेक्ष असते.
2. एकसुत्रता आणि लवचिकपणा ही परराष्ट्र धोरणाची गुणवैशिष्ट्ये आहेत.
3. परराष्ट्र धोरणासंबंधी भारताने अलिप्ततावादाचा पुरस्कार केला आहे.
4. सर्व राष्ट्रांशी मैत्रीचे आणि सहकार्याचे संबंध प्रस्थापित करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन विषयासाठी सुक्ष्म अध्ययन पध्दती बरोबरच विश्लेशणात्मक संशोधनपध्दत आणि माहितीचे संकलन पध्दत स्विकारली आहे.

**व्याप्ती :**

'परराष्ट्र धोरण' ही व्यापक संकल्पना आहे. आंतरराष्ट्रीय घडामोडी, इतर राष्ट्रांचे परराष्ट्र धोरण अभ्यासले जाणार आहे. परंतु प्रस्तुत संशोधन मात्र 'भारतीय परराश्ट्र धोरणः सर्वसमावेशक सुरक्षा दृष्टिकोन' यांपुरतेच मर्यादित आहे.

**संशोधन साधने :**

संशोधन पत्रीका लेखन करतांना विविध पुस्तकं, मराठी विश्वकोष, सामाजिक ज्ञानकोश, वर्तमानपत्र इत्यादींचा साधनं म्हणून उपयोग केला.

**विषय प्रवेश :**

एका राष्ट्राने दुस–या राष्ट्राविषयी स्विकारलेले धोरण म्हणजे परराष्ट्र धोरण होय 'राष्ट्रहित' साधणे हे परराष्ट्र धोरणाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे. ते साध्य करण्याच्या दृष्टिने धोरणांची आखणी केली जाते.[3] परराष्ट्र धोरण निश्चित करतांना देशांतर्गत धोरणे, देशाची तत्वप्रणाली, देशाचे भौगोलिक स्थान, संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या तत्वप्रणालीचा प्रभाव इत्यादींचा विचार केला जातो. आधुनिक जागतिक व्यवस्थेमध्ये वाढलेले परस्परावलंबन, विभागीय संघटना, तांत्रीक व यांत्रीक प्रगती युध्दशास्त्रात घडून आलेले बदल, सैनिकी प्रश्नांपेक्षा आर्थिक प्रश्नांना आलेले महत्व यांमुळे देशाचे परराश्ट्रीय धोरण ठरविणे हे जिकीरीचे व अतिशय महत्वपुर्ण जबाबदारीचे काम ठरते. त्यासाठी कुशल, पारंगत राजनीतिज्ञांचा उपयोग केला जातो.

**भारतीय परराष्ट्र धोरण :**

**सुरक्षा दृष्टिकोन** : भारताचे परराष्ट्र धोरण ठरवितांना भारताची भौगोलिक परिस्थिती आणि तिचे दक्षिण आशियातील स्थान प्राचीन काळापासुन म्हणजेच रामायण, महाभारत, कौटिल्याचे अर्थशास्त्र त्यातील मंडलसिध्दान्त, विविध साम्राज्य (उदा. मौर्य, चोल यांसारखे) आणि विविध सामरिक संस्कृतीत विचारांत घ्यावी लागते. भारताच्या दक्षिणेला हिंदी महासागर, पूर्वेस बंगालचा उपसागर, पश्चिमेस अरबी समुद्र आहे. भौगोलिकदृश्टिने विस्तारीत समुद्रकिनारा भारताला लाभलेला आहे. हिंदी महासागरातील इतर राष्ट्रांच्या हालचालींचा व शेजारील राष्ट्राच्या धोरणांचा भारताच्या परराष्ट्र धोरणावर प्रामुख्याने परिणाम झालेला दिसतो. भारतीय परराश्ट्र धोरणात चीन, नेपाळ, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, मॅनमार, या सर्व शेजारी देशांबरोबरच्या संबंधांना कायमचे महत्व राहीले आहे. भारतीय परराष्ट्र धोरणाला स्वातंत्र्य संग्रामकाळापासून एक निश्चित पूर्वपीठिका प्राप्त झाली आहे. शांतता, मैत्री आणि विश्वबंधुत्व यांचा राजकिय व सांस्कृतीक वारसा भारतास लाभला आहे, त्यातुनच अलिप्ततावादी धोरणाचा उगम झाला. महात्मा गांधींचा मानवतावाद आणि पंडित नेहरुंचा भ्ाुध्द आंतरराष्ट्रीयवाद या दोहोंचा भारतीय परराश्ट्र धोरणावर प्रभाव दिसतो. साम्राज्यवादास विरोध, वंशव्देशास विरोध आणि जागतिक शांतता व स्वातंत्र्य यांस पांठिबा ही भारतीय परराष्ट्र धोरणाची आधारभुत तत्वे आहेत.

दुस–या महायुध्दानंतर भांडवलशाही व साम्यवादी सत्तागटांमध्ये जगाची विभागणी झाली, तेव्हा भारताने या दोन्ही गटांपासुन अलिप्त राहण्याचे ठरविले. भारत, युगोस्लाव्हिया, इजिप्त यांनी अलिप्ततावादी राष्ट्रांचा गट स्थापन केला आणि ती एक चळवळ म्हणून पुढे आली. या अलिप्ततावादी चळवळीची पंचशील तत्वे. 1) प्रादेशिक अखंडत्व व सार्वभौमत्वाबाबत आदर 2) अनाक्रमण 3) अंतर्गत कारभारात ढवळाढवळ न करणे 4) समानता 5) शांततामय सहजीवन ही आहेत. भारताने अलिप्ततावादी चळवळीला एक विधायक दिशा दिली.[4] ढोबळमानाने अलिप्तता याचा अर्थ कोणत्याही सैनिकी गटात सामील न होता, प्रत्येक आंतरराश्ट्रीय प्रश्नावर स्वतंत्रपणे निर्णय घेणे, असा केला जातो. दुस–या महायुद्धानंतर सुरु झालेल्या शीतयुद्धाच्या आणि बड्या राष्ट्रांनी स्थापन केलेल्या सैनिकी युतींच्या संदर्भात हे धोरण ठरविले गेले होते. एखाद्या गटात शिरल्यामुळे दुस–या गटाचा रोश ओढवून आपली सुरक्षितता धोक्यात येते, दोन सैनिकी गटांच्या स्पर्धेतुन युद्धाचा संभव वाढतो, म्हणुन अलिप्त राहून दोन्ही गटांत सामंजस्य घडवून आणून शांतता प्रस्थापित करणे अधिक श्रेयस्कर, असे पंडित नेहरुंना वाटत होते.[5] सुरक्षेतून भ्ाांतता स्थापन करण्याऐवजी शांततामय सहजीवनातून सुरक्षितता साध्य करण्यावर त्यांचा भर होता. नवोदित राष्ट्रांच्या कारभारात बड्या राश्ट्रांच्या हस्तक्षेपास वाव असू नये, यासाठी संयुक्त राश्ट्राचे शांतीसैन्य उभारण्यांस भारताने मदत केली, असे असले तरी संयुक्त राष्ट्रासंबंधीचे भारताचे धोरण आदर्शवादी कल्पनांवर आधारलेले नसुन राष्ट्रहिताच्या पायावरच उभारलेले आहे.

कोणत्याही देशाच्या परराष्ट्रीय धोरणाचा त्याच्या संरक्षणव्यवस्थेशी निकटचा संबंध असतो. आपणांस कोणत्या देशाकडून संभाव्य धोका आहे, हे हेरुन त्यावर राजनैतिक आणि सैनिकी अशा दोन्ही प्रकारांची उपाययोजना करणे आवश्यक असते. भारताने आपल्या संभाव्य धोक्यांचा विचार करुन त्यादृष्टिने आर्थिक, लष्करी, औद्योगिक सामर्थ्य वाढवून सशस्त्र सेनादलांचा विकास केला आहे. 1947 मध्ये पाकिस्तानचे आक्रमण आणि 1962 च्या चीनच्या आक्रमणानंतर या दोन्हींपासून संरक्षण करण्याची आवशकता भारतास निर्माण झाली. चीनने अणुस्फोट केल्यानंतर ही जाणीव अधिकच तीव्र झाली. रशिया–चीन दुफळी लक्षात घेता 1962 नंतर भारताचे परराष्ट्र धोरण रशियाकडे जास्त झुकू लागल्याचे दिसते भारताने रशियाकडून महत्वाच्या क्षेत्रात लष्करी व आर्थिक साह्य मिळविले. शस्त्रास्त्रांच्या क्षेत्रात स्वावलंबी होण्यासाठी देखील रशियाची मदत घेतली, अणुतंत्रज्ञानाचा विकास करण्यासाठी मात्र भारताने कॅनडा व अमेरिका यांकडून साह्य मिळविले, अणुशक्तीबाबत स्वावलंबी होण्यासाठी 1974 मध्ये भारताने अणुस्फोट केला, असे असले तरी तेव्हापासुन आजपर्यंतही भारताचे अणुविषयक धोरण हे शांततेसाठी आणि विधायक कार्यासाठीच आहे.

आर्थिक आणि लष्करी क्षेत्रातील दोन्ही बड्या राष्ट्रांच्या साह्यामुळे भारताच्या अलिप्ततावादास नवी दिशा प्राप्त झाली. भारत–पाक 1971 च्या युद्धानंतर भारताने चीन व पाकिस्तान यांच्याशी सर्वसामान्य संबंध स्थापन करुन परराष्ट्र धोरणावर व संरक्षण व्यवस्थेवर पडणारा ताण कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच शेजारच्या सर्व राश्ट्रांसंबंधी असलेले प्रश्न सोडविण्याचे आवर्जुन प्रयत्न केले आहेत.[6] वर्तमानकालिन परिस्थितीत– पाकिस्तान आणि चीनचे आक्रमक धोरण, चीन पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर (CPEC), Cross Border Terrorism, अफगाणिस्तानातील तालिबान राजवट, कोरोना महामाही संकटातून निर्माण झालेली आर्थिक संकटं, आंतरराष्ट्रीय घडामोडी, बदललेली राजकिय, सामाजिक, सुरक्षात्मक चौकट, अंतर्गत धोके या घटनांचा परिणाम परराश्ट्र धोरणांवर निश्चित होतो. अशा परिस्थितीत जगात काय घडते याचा सातत्याने अभ्यास राजदूत करित असतात आणि अभ्यासाअंती एक निश्चित धोरण आखले जाते. 1990 पूर्वी परराष्ट्र धोरणात पारंपारिक आव्हानांचा विचार होता. परंतु 1990 मध्ये शीतयुद्धानंतर भारताच्या परराष्ट्र धोरणांस नविन वळण देणे भाग पडले. अलिप्ततावादाच्या पलिकडे दूरदर्शी निर्णय हे आपल्या स्वतःच्या विचाराने घेऊन New Strategic Autonomy या तत्वास प्राधान्य मिळू लागले. राष्ट्रहिताच्या दृष्टिने भारताने Strategic vkf.k comprehensive partnership अनेक देशांबरोबर

केलेली आहे. दहशतवाद, पर्यावरण बदल, सागरी सुरक्षा, स्थलांतरीतांचे प्रश्न यासारख्या नविन आव्हानांना तोंड देण्याची तयार करतांना लष्करी आणि आर्थिक शक्तीबरोबरच सौम्य, मृदु शक्तीचा (Soft Power) वापर करावा लागतो. बदलत्या वैश्विक संदर्भानुसार आपल्या परराष्ट्र धोरणांत बदल करावे लागतात. परंतु असे करतांना पंचशिल या तत्वास धक्का पोहचवू दिला जात नाही. आंतरराष्ट्रीय परराष्ट्र धोरणात Hard Power आणि Soft Power संकल्पनेमार्फत राष्ट्र बलाढ्य किंवा कमकुवत आहे का? हे अभ्यासता येत


**बदलते वैश्विक संदर्भ**

| | |
|---|---|
| 1. 1947—1990— शीतयुद्धाचा कालखंड | 1. 1990— नंतरची एकधृवीयता |
| 2. पारंपारिक आव्हाने, प्रादेशिक सुरक्षेचे प्रश्न | 2. सोव्हिएत संघाचे विघटन |

| | |
|---|---|
| 3. देशाच्या अखंडतेला आव्हान<br>↓<br>भारत—चीन    भारत—पाकिस्तान | 3. एकधृवीय जग |
| 4. Hard Power –<br>↓<br>(Military Power, Economic Power) | 4. चीनचा महासत्ता म्हणून उदय |
| | 5. अपारंपारिक आव्हाने<br>↓<br>दहशतवाद, सागरी सुरक्षा, अंमली पदार्थ तस्करी, लहान शस्त्रांचा व्यापार, विविध साथीचे रोग, स्थलांतर, पर्यावरण बदल |
| | 6. Soft Power-<br>समाजिक, सांस्कृतिक, राजनय<br>(मूल्यवर्धित समाज रचना) |

वरील तक्त्यामधील संदर्भ हे केवळ बदलत्या वैश्विक चौकटीचे एक उदाहरण आहे. भारताच्या संदर्भात विचार करायचा झाल्यांस भांततामय सहअस्तित्वातून परराष्ट्र धोरणाकडे पाहिले जाते. भौगोलिक दृष्टिकोनातून काही घडामोंडीचा परिणाम सुरक्षेवर होतो. उदा. त्सुनामी संकटाच्या वेळी — 2006 मध्ये भारतीय नौलदाने अमूल्य कार्य केले त्यावेळेपासुन सागरी धोरण महत्वाचे ठरले. प्राचीन काळात चोल हे आग्नेय आशियात सागरी मार्गानेच गेले होते. इ.स.पूर्व घटना, इसवीसनातील विविध साम्राज्य, राजवंशातील घटना, मध्ययुगीन काळातील घटना यांचा अभ्यास करुनच वर्तमानकालीन सर्वसमावेशक परराष्ट्र धोरण निश्चित केले जाते.

आंतरराष्ट्रीय समुदायाच्या माध्यमातून राष्ट्राचे हित साधण्यासाठी विविध धोरणांचा वापर म्हणजे परराष्ट्र धोरण होय. भारताचे माजी राजदूत जे. बंडोपाध्याय यांनी परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक अधोरेखित केले होते. परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक



1. **इतिहास आणि संस्कृती :**

रामायण, महाभारत ही महाकाव्यं, हडाप्पा संस्कृती, चोल साम्राज्याचा इतिहास, मध्ययुगीन इतिहास, पर्यटन वसाहतवाद आणि नाम चळवळीचा आधुनिक इतिहास यांसारख्या बाबींचा अभ्यास धोरण निर्धारणांत महत्वाचा ठरतो.

2. **भूगोल :**

छेशाचे भौगोलिक स्थान, भोजारील राश्ट्रांचे लश्करी सामर्थ्य, त्याचा आपल्या राश्ट्रावर होणारा परिणाम, वायव्येकडून झालेली आक्रमण, सागरी धोरण, खनिज संपत्ती, हवामान बदल करार यांचा अभ्यास अत्याव''यक आहे.

3. **अर्थव्यवस्था :**

नविन आंतरराष्ट्रीय आर्थिक ऑर्डर, (NIEO) OPEC (तेल निर्यात करणा–या राष्ट्राचे संघटन) WTO, IMF यांसारख्या अर्थव्यवस्थेशी संबंधित संघटनांशी संबंध चांगले राखणे आवश्यक आहे. यांत थोडीही गडबड झाली तरीही अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम होऊ शकते आणि त्याचा परिणाम परराष्ट्र धोरणांवर होतो. आर्थिक सहकार्यातून स्थापन झालेल्या E.U., SAARC, ASIAN, BRICS, QUAD. संघटनांशी सातत्याने संबंध स्थिर ठेवणे, वाढविणे आवश्यक आहे. 1991 नंतर आंतरराष्ट्रीय समीकरणे बदलली, शीतयुद्धकाळात 'सुरक्षा' हे तत्व महत्वपूर्ण होते परंतु शीतयुद्धानंतर मात्र 'आर्थिक तत्वास' महत्व प्राप्त झाले. नविन जागतिक व्यवस्थेत परस्परावलंबन वाढले. त्यांत राष्ट्रीयतेस महत्व प्राप्त झाले, आर्थिक, लष्करी, सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक, व्यापारी संबंधाची समीकरणे बदलली. उदा. 2004 मधील Y2L संगणकीय प्रणालीवर संकट, 2008 मधिल आर्थिक संकट, त्या संकटाचा अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांना फटका बसला होता, तुलनेने चीन, भारतांस तितका फटका जाणवला नाही. 2008 नंतर भारत–चीन या दोन अर्थव्यवस्था उदयास आल्या. परराष्ट्र धोरणांसाठी हा महत्वाचा घटक मानला जातो. शांतीपर्वात उल्लेख आहे की, राज्याचा पाया लश्कर आणि तिजोरी असते. परराष्ट्र धोरणाचे नियोजन आणि लष्करासाठी अर्थव्यवस्था महत्वाची असते. कोविड–19 महामारी आरोग्याशी निगडीत असली, तरी त्यातून अर्थव्यवस्थेवर जो काही परिणाम गेल्या वर्षभरात झाला, त्याचा परिणाम परिणाम परपराष्ट्र धोरणांवर नि''चतच झाला आहे. परराष्ट्र धोरण निर्धारणात देशाचा विकास महत्वाचा आहे. देशांतर्गत बाबींचा विचार करुनच निर्णय घ्यावे लागतात.

4. **देशांतर्गत स्थिती :**

देशांतर्गत आर्थिक, राजकिय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, तांत्रीक, लष्करी, औद्येगिक, कृषी, शैक्षणिक, पर्यावरणीय, अंतर्गत प्रश्न, शेजारील देश अशा सर्व गोष्टींचा प्रभाव परराष्ट्र धोरण निर्धारणावर होतो. यासंदर्भात वर्तमानकालीन उदाहरण देता येतील. 1) जपानमध्ये सिकलसेल आजारावर संशोधन सुरु आहे. भारतातील सिकलसेल व्याधीचे रुग्ण, कुपोषणग्रस्तांचा विकास आणि आरोग्य सुधारण्यासाठी भारताने जपानशी आरोग्यविषयक केलेली चर्चा आणि उपाययोजना[8] 2) तिस्ता पाणी करार 3) भारत–बांग्लादेश संबंध 4) तामिळ प्रश्न 5) नक्षलवादी कारवाया 6) सीमापार दहशतवाद 7) अफगाणिस्तान, बांग्लादेश आणि पाकिस्तानमधील हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी आणि ख्रिश्चन, 31 डिसेंबर 2014 रोजी किंवा त्यापूर्वी भारतात दाखल झालेल्या अवैध स्थलांतरितांना भारतीय नागरिकत्वासाठी पात्रता देण्यासाठी CAA (Citizenship Amendment act, 2019-) या कायद्याने नागरिकत्व कायदा, 1955 मध्ये सुधारणा केली आहे.[9] या सर्व घटना परराष्ट्र धोरणावर परिणाम तर करतातच परंतु परराष्ट्र धोरण ठरविण्यांत महत्वाची भूमिका बजावतात.

5. **बदलती भू–राजकिय परिस्थिती :**

बदलती भू राजकिय परिस्थितीनुसार आपल्या परराष्ट्र धोरणांत बदल करावे लागतात. उदा. 1) शीतयुद्धकाळात अलिप्ततवाद तत्वांस अधिक प्राधान्य 2) राष्ट्रहिताच्या दृष्टने सोव्हिएत रशियांशी करार 3) 1971 च्या भारत–पाक युद्धाच्या वेळी अमेरिकेने 7 वे आरमार पाकिस्तानच्या मदतीसाठी पाठविले होते. 4) शास्त्र स्पर्धा 5) अंमलीपदार्थ तस्करी 6) वातावरण बदल 7) साऊथ चायना सी बाबतीत चीनचे वर्चस्ववादी धोरण, 8) विविध लष्करी, आर्थिक सहकार्य संघटना 8) INDO-PACIFIC CONCPET 9) चीनच्या वर्चस्ववादी प्रवृत्ती विरोधात, भारत, ऑस्ट्रेलिया, अमेरिका, जपान यांनी एकत्रीत येऊन केलेला क्वाडसमुह 10) त्सुनामी संकट (2004) 11) आंतरराष्ट्रीय सामरिक आणि आर्थिक धोरणं 12) कोरोना महामारीतून बदललेली आर्थिक समीकरणे 13) अफगाणिस्तानातील तालिबान राजवट 14) दहशतवादी संघटनांचे कृत्य 15) लष्करी सुरक्षा दृष्टिने प्रयत्न 16) आफ्रिकन युनियन 17) Look East, Act East Policy 18) शांघाय सहकार्य 19) ब्रीक्स 20) WTO, WHO, IMF मधिल भूमिका अशा घटना परराष्ट्र धोरणात महत्वाची भूमिका बजावतात. यांचा अभ्यास परराष्ट्र धोरण ठरवितांना करावाच लागतो.

6. **देशाचे नेतृत्व :**

भारतीय परराष्ट्र धोरणाचा पाया आदर्शवाद, वास्तववाद आणि व्यावहारिकता या तीन गोष्टींवर आधारित आहे. पंतप्रधान नेहरुंनी अलिप्ततावादी चळवळीतून परराष्ट्र धोरण आखले, तर वर्तमानकाळात पंतप्रधान मोदींनी या चळवळीचा धोरणात्मक रुपांत बदल केला. अनेक राष्ट्रांशी आर्थिक, व्यापारी, लष्करी, आण्विक, शैक्षणिक, सामाजिक, औद्योगिक विकासाच्या दृष्टिने करार केलेत. हे सर्व परराष्ट्र धोरणाच्या दृष्टिने महत्वपूर्ण आहे.

7. **राष्ट्रीय सामर्थ्य :**

1) आज भारतात कार्यकुशल मनुष्यबळ सर्वाधिक आहे. 18 ते 60 वयोगटातील लोकसंख्येचा उपयोग सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टिने महत्वपूर्ण ठरणार आहे.

2) 21 जुन जागतिक योग दिन संकल्पना 3) अनेक देशांशी आरोग्यविषयक सुविधांसाठी केलेले करार (व्हॅक्सिन डिप्लोमसी). 4) सांस्कृतिक एकत्रीकरणासाठी अनेक प्रकल्प 5) मान्सुनचे वारे ज्या देशांतुन जातात त्यांना एकत्रीत आणणे[10] 6) शेजारील देशांशी करार आणि देवाणघेवाण अशा अनेक स्तरांवर राष्ट्रीय सामर्थ्य अधोरेखित होते. परराश्ट्र धोरणाच्या दृष्टिने राश्ट्रीय सामर्थ्य अतिशय महत्वाचे आहे. थोडक्यांत देशाची भौगोलिक रचना, लोकसंख्या, नैसर्गिक संसाधने, औद्योगिक विकास, लष्करी सामर्थ्य, ऐतिहासिक परंपरा, विचारप्रणाली, आंतरराश्ट्रीय कायदा, संयुक्त राष्ट्रसंघटना, आपले शत्रु–मित्र त्यांचे लष्करी, आर्थिक, सामर्थ्य, या सर्व घटकांचे मूल्यमापन करुनच परराश्ट्र धोरण ठरते.

**भारताच्या परराष्ट्र धोरणाची आधारभुत तत्व, उद्‌दिष्टे आणि साधने :**

भारताच्या परराष्ट्र धोरणावर – 1) महात्मा गांधीचा अहिंसावाद 2) रविंद्रनाथ टागोर यांचा आंतरराष्ट्रीय वाद 3) महर्षी अरविंद यांचा अध्यात्मवाद 4) जवाहरलाल नेहरुंचा लोक''ाही समाजवाद या चार विचारसरणींमधून भारतीय परराश्ट्र धोरणाची जी आधारभूत तत्वं विकसित झालीत ती खालीलप्रमाणे सांगता येतील– 1) वसाहतवाद आणि नववसाहतवादाला विरोध 2) वसाहतवादाचा आधार असणा–या वंशवादी मनोवृत्तीस विरोध 3) स्वतंत्र परराष्ट्र धोरणाचा स्विकार 4) आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक विकास साधणे आणि राश्ट्राराष्ट्रातील संघर्ष सोडविणे. 5) शांततामय सहजीवन 6) आंतरराश्ट्रीय भाांतता आणि सुरक्षेसाठी– संयुक्त राष्ट्र संघटनेच्या भूमिकेस पूर्ण समर्थन देणे 7) अलिप्ततावाद 8) पंचशिल तत्व, 9) शेजारील राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे, त्या राष्ट्राच्या राजकिय सार्वभौमत्वाचा आदर करणे. 10) कोणत्याही मोठ्या राष्ट्राच्या दबावाला बळी न पडता स्वतंत्रपणे परराष्ट्र धोरणांविषयी निर्णय घेणे, निर्णय स्वातंत्र्याचा अधिकार 11) आंतरराश्ट्रीय भाांतता व सुरक्षेसाठी निःशस्त्रीकरण प्रक्रियेस समर्थन[11] या तत्वांनुसारच भारतीय परराष्ट्र धोरणाची उद्‌दिष्टे निश्चित झाली होती. उदा. 1) वसाहतवादास विरोध 2) उदारमतवादी लोकशाहीचा आदर 3) सामुहिक विकास 4) सर्व राष्ट्रांशी मैत्री आणि सहकार्याचे संबंध 5) संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या शांतता भूमिकेचे समर्थन इत्यादी 12 परराष्ट्र धोरणाची उद्‌दिष्ट्ये ठरविल्यानंतर ती साध्य करण्यासाठी जी साधने किंवा मार्ग अनुसरले जातात ते याप्रमाणे

**परराष्ट्र धोरणाची मार्ग**

| | | |
|---|---|---|
| राजनय | सत्ता समतोल | आर्थिक दडपण |
| प्रचार यंत्रणा | सैन्यशक्ती | |

1) परराष्ट्र धोरणाची उद्‌दिष्टं ठरविल्यानंतर ती साध्य करण्यासाठी प्राचीन काळापासुनच 'राजनय' हा मार्ग आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात या संदर्भात सखोल विवेचन आहे. 2) सत्ता संतुलन म्हणजे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात कोणताही एक देश अती बलशाली होऊ नये यासाठी केलेली राष्ट्रांची युती होय. अमेरिका व सोव्हिएत रशिया यांच्यात सत्ता संतुलन राखण्याचे काम अलिप्त राष्ट्रांनी केले होते. 3) आपले उद्‌देश्य साध्य करण्यासाठी अनेक राष्ट्रं दुस–या राष्ट्रांवर आर्थिक दडपण आणतात. उदा. खनिज तेलासंबंधी 1973 मध्ये अरबदेशांनी केलेली पाश्चात्य राष्ट्रांची नाकेबंदी 4) प्रचार प्रतिस्पर्धी राष्ट्राचे मनोधैर्य कमी करणे, त्या राश्ट्रांत संभ्रम निर्माण करणे, लोकालोकांमध्ये संघर्षाची भावना निर्माण करणे, अफवा पसरविणे, बुद्धीभेद करणे आणि प्रचार माध्यमातून आपल्यांस अनुकुल परिस्थिती करुन घेणे. 5) सैन्यबळ–सैन्यबळाचा प्रत्यक्ष उपयोग करणे किंवा सैन्यबळाचा उपयोग करण्याची धमकी देणे यांचा वापर परराष्ट्र धोरणासाठी प्राचीन काळापासुनच करण्यांत आला आहे. क्लाऊत्सेविज यांच्या विचारानुसार, ''युद्ध हे राजनयाचेच एक वेगळे रुप आहे, सैनिकी हस्तक्षेप, भास्त्रपुरवठा किंवा भास्त्र बंदी करुन किंवा आण्विक शक्तीचा वचक बसवुन इतर राष्ट्रांस आपणांस योग्य ती भुमिका घेण्यास भाग पाडले जाते.13 या सर्व मार्गांचा उपयोग परराष्ट्र धोरणासंदर्भात परिस्थितीनुरुप केला जातो विचार प्रणालीचा परराष्ट्र धोरणांवर प्रभाव पडतो.

**सारांश –**

भारताच्या परराष्ट्र धोरणाचा सखोल अभ्यासाअंती अधोरेखित होते की,

1. परराष्ट्र धोरणांत राष्ट्रहित सुरक्षित राखणे आणि वृद्धींगत करणे महत्वाचे आहे.
2. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय घटनांचे पडसाद परराष्ट्र धोरण निर्धारणावर परिणाम करतात.
3. परराष्ट्र धोरण निर्धारणांत– शिष्टाई, मुत्सद्‌देगीरी आणि कूटनिती महत्वाची आहे.

**संदर्भ :**

1. *श्री. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रीः मराठी विश्वकोश–खंड. 9ः महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई (1980), पृ. 186.*
2. *श्री. जोशी, उपरोक्त*

3. डॉ. जोशी बी. आर. आणि इतरः 'डायमंड सामाजिक ज्ञानकोश–खंड–1', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, (2007), पृ. 850
4. *Madan Gopal: Indian as a world Power: Aspects of Foreign policy, delhi, 1972.*
5. *Nanda B.R. : Indian Foreign Policy : The Nehru Years, Delhi, 1976.*
6. *Jackson Robort : South Asian Crisis : India, Pakistan and Bangaladesh, New Delhi, 1978.*
7. डॉ. आपटे संज्योतः 'भारतीय परराष्ट्र धोरणाचा पाया आणि प्रासंगिकता' विषयांवरील व्याख्यान दि. 16/8/2021, दि. 17/09/2021 वेळ 10.30 a.m.
8. भावठाणकर अनिकेतः परराष्ट्र धोरण निर्धारिक घटक आणि भारतीय सामरिक धोरण ''विषयावर व्याख्यान, 17/8/2021, दि. 18/09/2021 वेळ. 11.15 a.m.
9. *https://en.m.wikipedia.orgfn-19@09@2021 osG 11-25 a.m.*
10. भावठाणकर अनिकेत, उपरोक्त
11. डॉ. देवळाणकर शैलैन्द्रः भारतीय परराष्ट्र धोरणः प्रतिभा प्रकाशन, पुणे 2005, पृ. 27.
12. डॉ.देवळाणकर, उपरोक्त, पृ. 19.
13. डॉ. धर्माधिकारी कविता डी.: 'सामारिक विचारवंत', पायल पब्लिकेशन्स, पुणे. 2017, पृ. क्रं. 10.